# प्रकरण –14

रुग्णालयामध्ये नियमितपणे योजना राबविल्या जातात / गरीब धर्मादाय निधीची सुविधा आहे.

गरीब आणि गरजु रुग्णांना आर्थिक सहाय्य मिळावे हा या निधीचा उद्देश आहे.

यामध्ये काही विशिष्ट लक्ष्य आखलेले नसते परंतु आवयकतांवर ते अवलंबून आहे.

या गरीब धर्मादाय निधीमधून आर्थिक सहाय्य घेण्यासाठी पात्र होण्यास कोणतीही व्यक्ती ही दारिद्र्य रेषेखाली असली पाहिजे. अशा व्यक्तीच्या बाहय रुग्ण विभाग/ अंतर्गत प्रकरण पत्रकांवर के.बी. भाभा म्युनिसिपल जनरल रुग्णालय, कुर्ला (प) मधील डॉक्टरने पूर्ण शिफारस लिहिली असली पाहिजे.

ही सुविधा प्राप्त घेण्यासाठी रुग्णाने साध्या कागदावर समाज विकास अधिका-याकडे अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जासाठी कोणतेही शुल्क नाही. अर्जासोबत त्याने त्याच्या रोगनिदानाच्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रति जोडणे आवश्यक आहे. समाज विकास अधिकारी रुग्णाची व त्याच्या नातेवाईकांची मुलाखत घेतील व अर्जावर त्याचा शेरा लिहून वैद्यकीय अधिक्षक यांचेकडे अंतिम मंजूरीसाठी पाठवतील. सामान्यतः या प्रकियेस 1 दिवस लागतो.

लागणारी औषधे रुग्णालय खरेदी करुन रुग्णास उपलब्ध करुन देतात. खाजगी तपासणीसाठी जे शुल्क लागेल ते रुग्णालयाकद्वारे थेट तपासणी करणा-या चिकितसकास अदा करण्यात येईल.

मृत व्यक्तींच्या ज्या नातेवाईकांना शव मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर घेऊन जावयाचे असेल व ते इप्सित स्थळी 24 तासांच्या आंत पोचणार असतील तर रुग्णालय त्यांना शव नेण्यासाठी मान्यता पत्र देते.

सही/-
वैद्यकिय अधिक्षक,
के.बी.भाभा रुग्णालय कुर्ला(प)